आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
५ सप्टेंबर २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- व्यक्तीचा स्वाभिमान आणि संरक्षणासाठी शिक्षण अत्यावश्यक असून संवेदनशील शिक्षक या भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजवतात, असं राष्ट्रपतींचं प्रतिपादन

- राज्यातल्या ५ शिक्षकांना राष्ट्रीय पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान

- मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांचा आज शपथविधी

**आणि**

- उद्याच्या गणेशविसर्जनासाठी प्रशासनाची तयारी / ईद ए मिलाद निमित्त राज्यात विविध कार्यक्रम

**<><><><><>**

अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांप्रमाणेच शिक्षण हे व्यक्तीचा स्वाभिमान आणि संरक्षणासाठी अत्यावश्यक असून संवेदनशील शिक्षक या भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजवतात, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं. शिक्षक दिनाच्या निमित्ताने, नवी दिल्लीतल्या विज्ञान भवनात राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्यात त्या बोलत होत्या. माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनी देशात शिक्षक दिन साजरा केला जातो. या पुरस्कारविजेत्या शिक्षकांमध्ये महिलांची, तसंच ग्रामीण भागातल्या शिक्षकांची संख्या लक्षणीय आहे, याचा राष्ट्रपतींनी आवर्जून उल्लेख केला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातल्या तरतुदींचा उल्लेख करून मुलींच्या शिक्षणातली गुंतवणूक ही कुटुंब, समाज आणि देशाच्या उभारणीत अनन्यसाधारण भूमिका बजावते, असं प्रतिपादन त्यांनी केलं. आधुनिक भारताच्या उभारणीत सावित्रीबाई फुले यांच्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करताना त्या म्हणाल्या,

***होल्ड... बाईट- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू (१३ सेकंद)***

गेल्या काही वर्षांत उच्च शिक्षण, तसंच स्टेम, अर्थात विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित या क्षेत्रांमध्ये मुलींचा सहभाग वाढत असल्याचं त्यांनी सांगितलं. यावेळी राष्ट्रपतींनी देशातल्या ६६ शिक्षकांना उत्कृष्ट कार्याबद्दल पुरस्कार प्रदान केले. त्यात राज्यातल्या ५ शिक्षकांचा समावेश आहे.

नांदेड जिल्ह्यातल्या अर्धापूर जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक आणि विज्ञान विषयाचे शिक्षक डाॅ.शेख मोहम्मद वकीउद्दीन शेख हमीदउद्दीन यांनी विविध उपक्रमांच्या माध्यमातून शाळेला शिक्षणासोबतच सामाजिक सुधारणांचं केंद्र बनवण्याचं काम केलं. त्यांनी मुलींसाठी तात्पुरत्या स्वरुपात शाळेची शाखा सुरु केली. ५ लाख सॅनीटरी नॅपकीन उपलब्ध करुन दिले तसंच सामाजिक सहकार्यानं निधी उभारून शिक्षणासाठीची डिजीटल सामग्री उपलब्ध करून दिली. लातूरच्या दयानंद कला महाविद्यालयाचे संगीत विषयाचे प्राध्यापक डॉ. सांदिपान जगदाळे यांनी संगीत विषयाच्या अध्यापनाला शास्त्रीय ज्ञानासोबतच, नाविन्यपूर्ण प्रयोगांचीही जोड दिली. त्यांनी ब्रेल लिपीत संगीत अभ्यासक्रमाची पुस्तकं तयार केली तसंच QR कोडवर आधारित अभ्यास साहित्य विकसित करून शिक्षणाला अधिक सुलभ आणि परिणामकारक बनवलं. त्यांनी गोंड आदिवासी वस्त्यांमध्ये जाऊन शिक्षणाचा प्रसार केला, तसंच एचआयव्ही बाधित विद्यार्थ्यांचं शैक्षणिक पालकत्व घेतलं, यासोबतच ते दिव्यांग विद्यार्थ्यांनाही मदत करत आले आहेत. बारामतीचे पुरुषोत्तम पवार **मुंबईच्या** डॉ. नीलाक्षी सुभाष जैन आणि सोनिया विकास कपूर यांनाही राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार यंदा मिळाला आहे.

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री जयंत चौधरी आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते. पुरस्कार विजेत्या शिक्षकांशी नंतर राष्ट्रपतींनी अमृत उद्यानात संवाद साधला.

***<><><><><>***

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शिक्षक दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. व्यक्तीमत्वांची जडणघडण करण्यासाठीचा शिक्षकांचा समर्पण भाव म्हणजे अधिक मजबूत आणि उज्ज्वल भविष्याचा पाया असल्याचं त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांनी थोर विचारवंत आणि शिक्षक दिवंगत डॉ. एस. राधाकृष्णन  यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनकार्य आणि विचारांचंही स्मरण केलं आहे.

**<><><><><>**

मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांचा आज शपथविधी होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायवृंदाने गेल्या महिन्यात केलेली त्यांची मुख्य न्यायाधीश पदावर नियुक्ती करण्याची शिफारस राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंजूर केली होती. न्यायमूर्ती चंद्रशेखर यापूर्वी झारखंड उच्च न्यायालय तसंच राजस्थान उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून कार्यरत होते.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कराच्या रचनेत फेरबदल करण्याचा निर्णय नुकताच जीएसटी परिषदेनं घेतला. त्यात आता फक्त २ स्तरांवर करआकारणी होणार आहे. अन्नपदार्थांवरच्या कराच्या दराची अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून ….

**व्हॉईस कास्ट- आशुतोष सावे**

जीएसटी करांच्या पुनर्चरनेमुळे कर आकारणीत सुटसुटीतपणा आला आहे तसंच अनेक गरजेच्या वस्तूंवरचा कर कमी झाल्यानं त्या स्वस्त होतील. टेट्रापॅकमधे मिळणारं अतिउष्ण तापमानावर उकळलेलं दूध, तूप, पाश्चराईज्ड बटर, चीझ, ब्रेडस्प्रेड्स, कंडेन्स्ड मिल्क यांच्यावर पूर्वी १२टक्के दराने कर आकाला जात होता तो आता ५ टक्के झाला आहे. पॅकबंद पनीरवर पूर्वी १२ टक्के जीएसटी होता तो

आता पूर्णपणे काढून टाकण्यात आला आहे. याखेरीज सुकामेवा, खजूर, संत्री, मांदारिन सारक्या रसयुक्त फळांचे  वाळवलेले तुकडे यावरही आता १२ टक्क्यांऐवजी ५ टक्के कर आकारला जाईल. एकूणच पोषण आहाराच्या दृष्टीनं आवश्यक अन्नपदार्थ आता स्वस्त होतील, ऐकूया यावर एका गृहिणीची प्रातिनिधिक प्रतिक्रीया...

**बाईट-.आरती आपटे**

**<><><><><>**

अन्न आणि सार्वजनिक वितरण विभागानं सार्वजनिक वितरणविषयक देशव्यापी मूल्यांकन अहवाल केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांना सादर केला आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेत खरेदी, साठवण आणि तक्रार निवारणाचा समावेश आवश्यक असेलल्या ११२ आकांक्षित जिल्ह्यांमध्ये हे मूल्यांकन करण्यात आलं. या जिल्ह्यांमधल्या २७७ रास्त भावात विक्री करणारी दुकानं, खरेदी केंद्र यांना भेटी देण्यात आल्या तसंच, लाभार्थी आणि तक्रारदारांशी संवाद साधण्यात आला. सेवा वितरणाची व्यवस्था मजबूत करण्यावर तसंच जागरुकता मोहिमा सुरू करण्यावर आता लक्ष केंद्रित करण्यात येईल, अशी माहिती विभागाने दिली आहे.

**<><><><><>**

गणेशोत्सवाच्या मंगल पर्वाची उद्या अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणेश विसर्जनानं सांगता होणार आहे. गणेश विसर्जन सोहळ्यासाठी मुंबई पुण्यासह ठिकठिकाणच्या स्थानिक प्रशासनानं सुरक्षा, स्वच्छता, आरोग्य आणि पर्यावरणपूरक व्यवस्थेची काटेकोर आखणी केली आहे. ठिकठिकाणी विसर्जनासाठी कृत्रिम तलावांची व्यवस्था करण्यात आली असून अनेक ठिकाणी मूर्तीदानाचा उपक्रम राबवण्यात येणार आहे. वाहतुकीचं नियमन करण्यात येत असून सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे.

विसर्जन मिरवणुकांच्या पार्श्वभूमीवर ईद ए मिलाद निमित्तची शोभायात्रा येत्या सोमवारी काढण्याचा निर्णय मुस्लिम समाजाने घेतला आहे.

दक्षिण मुंबईतल्या बाणगंगा तलावात पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचं विसर्जनाची परवानगी द्यायला उच्च न्यायालयानं काल नकार दिला. बाणगंगा तलावात पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचं विसर्जन करू दिलं जात नसल्याबद्दल एका स्थानिक रहिवाशाने याचिका दाखल केली होती. बाणगंगा संरक्षित स्थळ असल्यानं तिथे गणेशमूर्ती विसर्जनाला परवानगी नसल्याचे आदेश पुरातत्व विभागाने महापालिकेला दिल्याचं महाधिवक्ता बीरेंद्र सराफ यांनी केला. हा युक्तिवाद मान्य करून मुंबई उच्च न्यायालयाने बाणगंगा तलावात मूर्ती विसर्जनासाठी परवानगी द्यायला नकार दिला.

**<><><><><>**

राज्यात उद्या गणेश विसर्जन होणार असून विविध ठिकाणी जय्यत तयारी करण्यात आली आहे. पुण्यात उद्या सकाळी साडे नऊ वाजल्यापासून विसर्जन मिरवणुकीला सुरुवात होणार आहे. या पार्श्वभूमीवर पुणे शहरातले १७ रस्ते सकाळी सात वाजल्यापासून ते मिरवणूक संपेपर्यंत बंद राहणार आहेत. आज मध्यरात्रीपासून ते ८ सप्टेंबरपर्यंत पुणे शहरात सर्व प्रकारच्या जड वाहनांना प्रवेशबंदी देखील करण्यात आली आहे. वाहतूक पोलीस विभागाने पर्यायी मार्ग तसंच पार्किंसाठीची व्यवस्था निश्चित केली असून नागरिकांनी सहकार्य करण्याचं आवाहन पोलिसांनी केलं आहे. नद्यांमध्ये प्रदूषण टाळण्यासाठी शहरातल्या प्रमुख घाटांवर कृत्रिम हौद, लोखंडी टाक्या ठेवण्यात आल्या आहेत. सुरक्षिततेसाठी यंदा प्रथमच काही घाटांवर ड्रोनद्वारे देखरेख ठेवली जाणार आहे. नागपूर शहरातही विसर्जनाची तयारी करण्यात आली आहे. गणेश मूर्तींच्या विसर्जनासाठी नागपूर महानगरपालिकेने शहरात कृत्रिम तलावांची व्यवस्था केली आहे.

**<><><><><>**

ईद मिलाद उन नबी अर्थात प्रेषित महंमद यांचा जन्मदिवस आज साजरा होत आहे. हिजरी कालगणनेनुसार प्रेषित महंमदांची ही पंधराशेवी जयंती असल्यामुळे यावर्षी या सणाला आणखी महत्त्व आहे. ठिकठिकाणी मिलाद मैफिली आणि सीरत परिषदांचं आयोजन करण्यात आलं आहे, तसंच मिरवणुका काढण्यात येत आहेत.

प्रेषित मोहम्मद पैगंबरांच्या जन्मदिनानिमित नागपूरमधे भव्य मिरवणूक काढत ईद मिलादुन्नबीचा उत्सव साजरा करण्यात आला. ईद निमित्त राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह सर्वधर्माच्या समाज बांधवांनी हजेरी लावत मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. शहरात नेहमीप्रमाणे सामाजिक ऐक्याचे दर्शन देत सर्व समाजाच्या वतीने जागोजागी मिरवणुकीत सहभागी बांधवांसाठी अल्पोपाहारासह, सरबत, पिण्याचे पाणी, फळ आदीचे स्टॉल लावण्यात आले होते.

जश्न ईद ए मिलादुनबी निमित्त हिंगोलीत भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तज्ञ डॉक्टरा मार्फत तपासणी करून मोफत औषध वाटप करण्यात आलं.४६० गरजवंत रुग्णांनी या मोफत आरोग्य सेवेचा लाभ घेतला.

**//<><><><><>//**